Date: 23rd November 2024

To,
The Manager,
National Stock Exchange of India Ltd.
Exchange Plaza,
Plot no. C/1, G Block,
Bandra-Kurla Complex
Bandra (E) Mumbai - 400 051

Ref.:- Scrip Code: MARINETRAN / ISIN: INE0P1P01017

Sub: ***Submission of copies of Newspaper Advertisement for Un-Audited Financial Results (Standalone) for the quarter and half year ended September 30, 2024***

Ref: Regulation 30 and 47 of SEBI (LO&DR) Regulations, 2015

Pursuant to Regulation 30 and Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing a copy of newspaper advertisement of Un-Audited Financial Results (Standalone) for the quarter and half year ended on September 30, 2024, published in the Newspaper of Financial Express, Mumbai edition English dated 23/11/2024 and Pratah Kaal (Marathi), Mumbai edition dated 23/11/2024. The same has been made available on company's website www.marintrans.in

Kindly take the same on records.

Yours Faithfully,

FOR AND ON BEHALF OF
MARINETANS INDIA LIMITED

MARINETRANS INDIA LIMITED NAVI MUMBAI

Nikhil Joshi
Company Secretary & Compliance Officer

Forex reserves log sharpest weekly drop, fall $17.76 bn

Plunge by $17.8 bn to $657.89 bn to over 4-month low

SIDDHI NAYAK
Mumbai, November 22

INDIA'S FOREIGN EXCHANGE reserves logged their sharpest weekly fall on record to a more-than-four-month low last week, as the dollar strengthened following the US election verdict, and the central bank sold from its reserves to limit the rupee's decline.

The reserves fell by $17.8 billion in the week of November 15 — the most since available data starting 1998 — to $657.89 billion, data from the Reserve Bank of India showed on Friday.

Forex reserves have fallen by a total of nearly $30 billion in the last six weeks and are down by $47 billion from the record high of $704.89 billion hit in late September. Changes in foreign currency assets are caused by the central bank's intervention in the forex market as well as the appreciation or depreciation of foreign assets held in the reserves. The outcome of the US elections boosted the dollar and US bond yields, leading to revaluation losses. Revaluation loss for the reporting week is estimated at $10.4 billion, while the RBI may have not sold dollars worth $7.2 billion in the week of Nov. 15, said Gaura Sen Gupta, India economist at IDFC FIRST Bank.

The rupee fell to its then-record low of 84.4125 last week against the dollar. The currency settled at 84.4450 on Friday, after hitting an all-time low of 84.5075 earlier in the session. Persistent outflows from Indian equities have also kept the rupee under pressure. Foreign investors have net sold local stocks and bonds worth more than $4 billion in November so far, after withdrawing $11.7 billion in October. The central bank's repeated intervention in the forex market limited a knee-jerk reaction in the local currency market, traders said.

"Despite the recent decline, we believe that India's forex reserves remain robust in terms of all external adequacy requirements with the import cover comfortably placed at over 11-months," said Aditi Gupta, economist at Bank of Baroda. Gupta expects forex reserves to rise to about $675-685 billion by March amid a revival in foreign inflows and a manageable current account deficit.

—REUTERS



Govt firming up scheme to reduce tomato price swings

SANDIP DAS
New Delhi, November 22

IN A BID TO rein in volatility in tomato prices, the government has formulated a scheme to give financial support to 28 business ideas including making of wine and bio-pesticides from the vegetable.

The scheme will be scaled up under a hackathon to boost processing of tomatoes and reduction in post-harvest losses. "These ideas are at the prototype stages and will be scaled up by giving support to ventures and attracting investments," Nidhi Khare, secretary, department of consumer affairs, told *FE*.

Among other ideas are innovative packaging and transportation solutions to enhance shelf life and minimise post-harvest losses, creation of processed products that extend usability, reduce wastage and ensure year-round availability for tomatoes, Khare said.

India is the second-largest producer of tomatoes in the world and around 30% of the output is lost at various stages of the value chain. These ideas will be presented to investors soon and these business ideas have led to filing of 14 patents and four design registration or trade marks. "We received 1,376 ideas and out of that 423 were shortlisted in the first stage and finally 28 ideas were funded," she said. These ideas were sought under categories including research scholars, industry individuals, startups, micro, small and medium enterprises, limited liability partnership and professionals.

She said more perishable commodities in milk has expanded through value additions and introduction of various products, in case tomato same could be replicated which would result in higher farmers realisation and availability of the commodity at an affordable prices throughout the year.

BOOSTING PRODUCTION

- Govt to give aid to 28 business ideas such as making of wine and bio-pesticides from tomatoes
- Innovative packaging solutions to enhance shelf life and minimise post-harvest losses
- Creation of processed products that extend usability, reduce wastage and ensure year-round availability
- Around 30% of the output is lost at various stages of the value chain

Govt to offer $4-5 bn electronics incentives

SHIVANGI ACHARYA & AFTAB AHMED
New Delhi, November 22

INDIA WILL OFFER up to $5 billion in incentives to companies to make components locally for gadgets from mobiles to laptops, two government officials said, in a bid to bolster the burgeoning industry and wean off supplies from China.

India's electronic production has more than doubled in the last six years to $115 billion in 2024, led by growth in mobile manufacturing by global firms such as Apple and Samsung. It is now the world's fourth-largest smart phone supplier. But the sector faces criticism for its heavy reliance on imported components from countries such as China.

"The new scheme will incentivise production of key components like printed circuit boards that will improve domestic value addition and deepen local supply chains for a range of electronics," one of the two officials said. The incentives are likely to be offered under a new scheme expected to be launched in two to three months, said the officials, who asked not to be identified as details of the scheme are not yet public.

The scheme is likely to offer incentives totalling between $4-$5 billion to global or local firms which qualify. The plan, designed by the India's electronics ministry, has identified components eligible for incentives and is in its final stages.

The finance ministry will approve the scheme's final allocation soon, the first official added, with the sources expecting it to be launched in the next 2-3 months. India's electronics ministry and finance ministry did not immediately respond to requests for comment. India is aiming to expand its electronics manufacturing to $500 billion by the fiscal year 2030, including production of components worth $150 billion, according to the government's top policy think tank Niti Aayog.

India imported electronics, telecoms gear, and electrical products worth $89.8 billion in FY2024, with more than half sourced from China and Hong Kong, according to an analysis by private think tank GTRI.

"This scheme is coming at a time when it is critical to promote component manufacturing that will help us aim for a global-scale of electronics production," Pankaj Mohindroo, head of India's Cellular and Electronics Association, said.

REUTERS

Sarda, SM Steels bag coal mines

SARDA ENERGY AND Minerals Ltd and SM Steels and Power Ltd have bagged two blocks on the second day of commercial coal mines auction. While Sarda Energy won a coal mine having geological reserves of 102.268 million tonne (MT) in Chhattisgarh, S M Steels and Power bagged a block with reserves of 77.9 MT in Jharkhand. This was the second day of the ongoing 10th round of e-auction, as per a coal ministry statement.

These two coal blocks upon operationalisation will generate annual revenue of ₹339.06 crore calculated at peak rated capacity (PRC) of these mines. The blocks will attract capital investment of ₹315 crore and will provide employment to 2,839 people.

PTI

World Bank's action plan to fill skills gap

FE BUREAU
New Delhi, November 22

THE WORLD BANK has recommended nine key action areas for six states in the country to address the skill gaps and enhance productivity. These suggestions are in sync with the plan to transform India into a global skills hub and make progressive policies to empower the population, as outlined by the Union government. As per the World Bank 'Jobs at Your Doorstep' report, the key areas that six states–Himachal Pradesh, Odisha, Maharashtra, Rajasthan, Madhya Pradesh, and Kerala–need to work on include: expanding access to skill education, offering broader/multi skill courses in school, trade mapping, focus on employability and technical skills, bettering infrastructure, roping in qualified and industry-trained teachers etc.

As per an analysis by World Bank, agriculture and service sectors offer a large opportunity for school based skilling in these states. Manufacturing MSMEs and large industries, on the other hand, prefer offering opportunities to qualified candidates, which schools don't generally train.

The report suggests that within agriculture, farm productivity, horticulture, and dairy farming can cater to the majority of high demand jobs for "school to work" in the six states. In services, the sectors are: BFSI, beauty and wellness, healthcare, fashion etc. And in information technology, they are IT software development & digital media.

The report says that the demand for each trade is different all over the country. Job prospects for trades like agriculture and manufacturing are sensitive to local context. Hence, state governments need to enable district level offices to lead "trade-mapping". The World Bank suggests states to set up skill hubs too. These are nodal skill centres identified to provide skill development and skill education training opportunities to target population segments from class sixth to twelth, as well as school dropouts. These hubs involve transforming large secondary schools into centres of vocational learning. They serve as centralized facilities equipped with advanced infrastructure and resources, offering students hands-on training in broad-based trades and employability skills.

झोपुचे संकेतस्थळ अद्ययावत : आतापर्यंत १७३६ योजनांना मंजुरी

संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रणालीद्वारे घरबसल्या हस्तांतरण तसेच तक्रारी करता येणार



मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे संकेतस्थळ अद्ययावत व सहजगत्या हाताळण्याजोगे असून आता झोपडीवासीयांना सदनिका हस्तांतरण वा भाडेविषयक तक्रारींसाठी प्राधिकरणात हेलपाटे घालावे लागणार नाहीत. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या प्रणालीद्वारे घरबसल्या हस्तांतरण तसेच तक्रारी करता येणार आहेत. आतापर्यंत १७३६ योजनांना परवानगी देण्यात आली असून या प्रत्येक योजनेचा सविस्तर तपशीलही संकेतस्थळावर नव्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आला आहे. या शिवाय प्राधिकरणाच्या मुख्यालयात अंतर्गत बदल करून झोपडीवासीयांसाठी सुलभ व्यवस्था निर्माण करून देण्यात आली आहे.

झोपु योजनांसाठी पात्रता यादी वेळेत मंजूर होणे आवश्यक असते. मात्र त्यासाठी मोठा कालावधी लागत असे. तसेच त्यात भ्रष्टाचार होत होता. माजी मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे यांनी या प्रक्रियेत सुधारणा करत सर्व सक्षम प्राधिकरणांना एकाच छत्राखाली आणले. त्यामुळे पात्रता यादीसाठी लागणारा विलंब कमी झाला. त्यासाठी कालमर्यादाही आखून देण्यात आली. याशिवाय रखडलेल्या भाड्याच्या वसुलीसाठी २१० क्रमांकाचे परिपत्रक जारी करण्यात आले. या परिपत्रकानुसार दोन वर्षांचे आगाऊ भाडे आणि पुढील वर्षासाठी धनादेश दिल्याशिवाय झोपु योजनेचे काम सुरु करण्यावर निर्बंध आणले गेले. त्याचा परिणाम होऊन झोपडीवासीयांचे रखडलेले भाड्याची वसुली मोठ्या प्रमाणात झाली. आतापर्यंत भाड्यापोटी ७०० कोटी रुपये प्राधिकरणाकडे जमा झाले आहेत. प्राधिकरणाकडून संबंधित झोपडीवासीयांना भाड्याचे परस्पर वितरण केले जात आहे. नवे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी संकेतस्थळावरच भाडे न मिळाल्याबाबत तक्रारी करण्याची सोय उपलब्ध करून दिली.

त्यामुळे झोपडीवासीयाला संकेतस्थळाद्वारे भाड्याच्या तक्रारी करता येऊ लागल्या. या तक्रारींचा दररोज मुख्य कार्यकारी अधिकारी वा सचिवांमार्फत आढावा घेतला जात असल्यामुळे उपनिबंधक विभागाला वा प्रत्येक तक्रारीचे निराकरण करून त्याबाबतचा अहवाला संकेतस्थळावरच उपलब्ध करून देणे बंधनकारक झाले आहे. याचा परिणाम म्हणजे भाडेविषयक तक्रारी कमी होऊ लागल्या आहेत. आता नवी योजना सुरु करण्यापूर्वीच विकासकाला दोन वर्षांचे आगाऊ भाडे देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या शिवाय सदनिका हस्तांतरणही आता ऑनलाईन करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करून आवश्यक ते शुल्क अदा केल्यानंतर ऑनलाईनच हस्तांतरण करण्याची प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे हस्तांतरणासाठी दलालांकडून सहन करावा लागणारा त्रास कमी झाला आहे. ही सर्व प्रक्रिया ज्यांना ऑनलाईन करता येत नाही त्यांच्यासाठी प्राधिकरणात मदत केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्राद्वारे संबंधितांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय २२८ योजना विविध प्राधिकरणांच्या माध्यमातून पूर्ण करून घेऊन त्याद्वारे येत्या तीन वर्षात दोन लाख झोपडीवासीयांच्या पुनर्वसनाचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. त्यापैकी घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगर योजनेला सुरुवात करण्यात आली आहे. याशिवाय म्हाडा व पालिकेमार्फतही काही योजना कार्यान्वित करण्यास सुरुवात झाली आहे.

मुख्यमंत्रीपदावरून कोणताही वाद नाही, निकालानंतर चर्चा करुन निर्णय घेऊ : रमेश चेन्नीथला

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेचा कौल महाविकास आघाडीलाच मिळेल व स्पष्ट बहुमतासह काँग्रेस महाविकास आघाडी सरकार स्थापन करेल असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे.

टिळक भवनमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही महाराष्ट्रातील जनता काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे. विधानसभेला जास्त मतदान झाल्याचा फायदाही काँग्रेस महाविकास आघाडीलाच होईल. मविआला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसत आहे त्यामुळे त्रिशंकु विधानसभेचा प्रश्न उद्भवत नाही. निवडून आलेल्या आमदारांना काँग्रेस पक्षाने हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली आहे का, यावर बोलताना चेन्नीथला म्हणाले की, काँग्रेसचे आमदार कठीण परिस्थितीतही पक्षासोबत राहिले आहेत त्यामुळे त्यांना हॉटेलमध्ये ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही, असेही चेन्नीथला म्हणाले.

पुण्यात टोळक्याची दहशत, वाहनांची तोडफोड

पुणे, दि. २३ (वार्ताहर): वानवडी परिसरातील भैरोबानाला येथे कोयतेधारी टोळक्याने भरदुपारी दहशत माजवत वाहनांची तोडफोड करून धुडगुस घातला आहे. टोळक्याने कार, रिक्षा, टेम्पो, दुचाकी अशा नऊ वाहनांची तोडफोड केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मयुर उत्तम गायकवाड (वय ३२, रा. चिमटा वस्ती, भैरोबानाला पुणे-सोलापूर रस्ता, वानवडी) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, भैरोबानाला परिसरातील सेंट पॅट्रीक चर्चजवळ चिमटा वस्ती आहे. गुरुवारी भरदुपारी टोळके वस्तीत आले. त्यांच्याकडे कोयते आणि दांडके होते. त्यांनी कोयते आणि दांडके उगारुन दहशत माजवण्यास सुरूवात केली. नंतर पार्क केलेल्या कार, रिक्षा, टेम्पो, दुचाकींची तोडफोड करुन टोळक्याने धुडगुस घातला. तसेच, रहिवाशांना शिवीगाळ देखील केली. तेव्हा मयूर गायकवाड हे घरातून बाहेर आले असता त्यांनाही या टोळक्याने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

'आम्ही या भागातील भाई आहोत. कोणी मध्ये पडले तर त्याला जिवे मारु', अशी धमकी दिली. त्यानंतर टोळके तेथून निघून गेले. त्यांनी जाताना कालव्याजवळ लावलेली दुचाकी व रिक्षाचीही तोडफोड केली. घटनेची माहिती मिळताच वानवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सहायक फौजदार कुंभार तपास करत आहेत. पसार झालेल्या टोळक्याचा शोध घेण्यात येत आहे.

गेल्या दीड महिन्यांपासून विधानसभा निवडणुकांचा माहोल शहरात होता. परिणामी गुन्हेगारी कारवाया काही प्रमाणात कमी झाल्याचे जानवते. परंतु, आता मतदान होऊन दिवस सरत नसतानाच पुन्हा शहरात गुन्हेगारांनी पुन्हा मुंडके वर काढले आहे. टोळक्यांकडून वाहनांची तोडफोड व दहशत माजविण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. त्यातील पहिली घटना वानवडी भागात वाहन तोडफोडीची घडल्याचे दिसत आहे. तर, मुंढव्यात खूनाचा प्रयत्न झाला आहे.

जेलमधून बाहेर आला अन् तिघांना तोडला

पुण्यात गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुण्यातील वेगवेगळ्या भागातून दररोज गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातच गेल्या काही दिवसाखाली कारागृहात राहून आलेल्या सराईत गुन्हेगार व त्याच्या साथीदारांनी तीन तरुणांवर किरकोळ वादातून तीक्ष्ण शस्त्राने वार करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना मुंढवा परिसरात घडली आहे. एका महिन्यापूर्वीच सराईत कारागृहातून बाहेर आला होता. याप्रकरणी मुंढवा पोलीस ठाण्यात महेश गजसिंह उर्फ दाद्या उर्फ डी याच्यासह दोन ते तीन अनोळखी साथीदारांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या हल्यात अजय हनुमंत पवार (वय ३१), अमित राजेश परदेशी (वय २६) व सोहेश अलमले (वय २६) हे तिघे जखमी झाले आहेत. याबाबत तुषार मेमाणे (वय २८) यांनी तक्रार दिली आहे.

सीएनजीच्या दरात २ रुपयांनी वाढ, आता किलो मागे ७७ रुपये मोजावे लागणार

नवीन दर २२ नोव्हेंबरपासून लागू झाले असून, मुंबई आणि परिसरात सीएनजीचा दर प्रतिकिलो ७५ रुपयांवरून ७७ रुपयांवर पोहोचला

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): राज्यात विधानसभा निवडणूक झाल्यानंतर सीएनजीच्या दरात वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना पुन्हा एकदा महागाईचा सामना करावा लागणार आहे. सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांनी वाढ केल्याची घोषणा महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) केली आहे. नवीन दर २२ नोव्हेंबरपासून लागू झाले असून, मुंबई आणि परिसरात सीएनजीचा दर प्रतिकिलो ७५ रुपयांवरून ७७ रुपयांवर पोहोचला आहे. या दरवाढीमुळे सीएनजीवर चालणाऱ्या वाहनधारकांना जादा पैसे मोजावे लागणार आहेत.

एमजीएलकडून मिळालेल्या माहितीनुसार, सीएनजीच्या दरात प्रतिकिलो २ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. ही दरवाढ मुंबईसह आसपासच्या परिसरात लागू करण्यात आली आहे. नैसर्गिक वायूच्या खरेदीत आणि इतर खर्चात वाढ झाली आहे. या कारणांमुळे सीएनजीच्या दरात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. जुलै २०२४ मध्ये सीएनजीचा दर वाढविण्यात आला होता.

यापूर्वी सीएनजीच्या दरात किलोमागे १.५० रुपयांनी वाढ करण्यात आली होती. त्यानंतर सीएनजीचा दर प्रतिकिलो ७५ रुपये किलो झाला. तर आता एमजीएलने घेतलेल्या निर्णयानुसार सीएनजीचा दर प्रतिकिलो ७७ रुपयांवर पोहोचला आहे.

मतमोजणीनिमित्त पुणे शहरात कडेकोट बंदोबस्त

पुणे, दि. २३ (वार्ताहर): विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीनिमित्त शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला असून, ३ हजार पोलिसांचा फौजफाटा ठेवण्यात आला आहे. शहरात कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, कसबा, वडगाव शेरी, हडपसर, कॅन्टोमेंट तसेच खडकवासला या आठ मतदारसंघाची निवडणूकीची मतमोजणी होणार आहे. कोरेगाव पार्क येथील एफसीआय गोडाऊन येथे सकाळी आठपासून मतमोजणी सुरू होत आहे. पुणे पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदानाचा दिवस देखील शांततेत पार पडला. दरम्यान, उद्या मतमोजणी होत आहे. यानिमित्ताने शहरात तीन हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. त्यासोबतच काही सूचना देखील पुणे पोलिसांकडून करण्यात आलेल्या आहेत.

मतमोजणीच्या २०० मिटर परिसरात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे तसेच ज्वलनशील पदार्थ किंवा हत्यारे घेऊन जाण्यास व बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यासोबत फोटो किंवा व्हिडीओ काढण्यासाठी मनाई असणार आहे. तर, ५ किंवा त्या पेक्षा जास्त लोकांनी एकत्रित येऊन बेकायदेशी जमाव जमवू नये, असेही आदेशात म्हंटले आहे. मतमोजणीनिमित्ताने केंद्रासमोरील साऊथ मेन रोडवर पुर्वेस लेन नं. ५ तसेच जक्शन पश्चिमेस ले नं. २ जंक्शनपर्यंत आणि लेन नंबर ३ व ४ वर २०० मीटरपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना नो पार्किंग झोन करण्यात आला आहे.

वाहतूक बंद रस्ते

- डॉन बॉक्सो युवा केंद्रापासून पुणे साऊथ मेन रोड हा मतमोजणीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वाहतूकीस बंद असणार आहे.
- सेंट मीरा कॉलेज व अतुरपार्क सोसायटीकडून साऊथ मेन रोडकडे जाणाऱ्या वाहनांना लेन नं. १ प्रवेश बंद असणार आहे.
- लेन नं. ५, ६ व ७ साऊथ मेन रोड व येणाऱ्या वाहनांना लेन नं. ४ हा वाहनांना बंद असणार आहे. सदर वाहनांनी उजवीकडे वळून इच्छित स्थळी जावे.
- लेन नं. २ वर प्लॉट नं.-३८ जैन प्रॉपर्टी येथे व लेन नं. ३ वर बंगला नं. ३७ व ३८ येथे साऊथ मेन रोडवर येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद असणार आहे.

कवी राजेंद्र गोणारकर यांच्या 'नवी लिपी' कविता संग्रहाचे दुबईत प्रकाशन

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी): नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक तथा लेखक - कवी डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्या 'नवी लिपी' या कविता संग्रहाचे दुबईत प्रकाशन करण्यात आले. जागतिक आंबेडकरवादी साहित्य मंडळ नागपूर, मिलिंद महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर, दीपस्तंभ सांस्कृतिक संघ सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने चौथे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन दुबई येथे नुकतेच संपन्न झाले.

संमेलनाच्या उद्घाटन सत्रात संमेलनाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते 'नवी लिपी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी संमेलनाचे उद्घाटक अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस, प्राचार्य डॉ. वैशाली प्रधान, डॉ. एच. एम. मकवाना , डॉ. एन. सिंह, डॉ. दीपककुमार खोब्रागडे, डॉ. जगन कराडे, प्राचार्य डॉ. अंजली ठाकरे, प्राचार्य डॉ.एस. डी. राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. 'नवी लिपी' संग्रहातील कविता ह्या नितांत सुंदर असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीचा आदरभाव व्यक्त करणाऱ्या या कविता मौलिक आहेत, असे मत डॉ. रावसाहेब कसबे यांनी व्यक्त केले.

राजेंद्र गोणारकर यांचा हा दुसरा कवितासंग्रह असून, या पूर्वी 'अनारंभ' (२००१) हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. याशिवाय त्यांची एकूण अकरा पुस्तके प्रकाशित आहेत. तसेच त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल त्यांना पाच राज्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.